तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharasthra.gov.in

अधिसूचना

क्रमांक : १०/एडीएम/पदविका/अधिसूचना/२०१७/ 3638
दिनांक : 19 JUL 2017

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील रिक्त जागा अद्यावत करणेबाबत...

संदर्भ:- १. या संचालनालयाची अधिसूचना क्रमांक १०/एडीएम/पदविका/अधिसूचना/२०१५/३६६० दि. ०५.०७.२०१७.
२. कार्यासन क्रमांक २अ, मुख्य कार्यालय, मुंबई यांची दिनांक रोजीची टिप्पणी

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमुद करण्यात येते की, पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीमध्ये नमुद केल्यानुसार संदर्भिय अधिसूचना क्रमांक १ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील रिक्त जागा अद्यावत करणेबाबत कळविण्यात आले होते.

आता, संदर्भिय टिप्पणी क्रमांक २ नुसार विषयांकित प्रकरणात अधिक स्पष्टता होण्यासाठी व संस्थांना थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील उपलब्ध जागांची खालीलप्रमाणे गणना (Calculation) करून त्यानुसार रिक्त जागा अद्यावत करणेबाबत ठरविण्यात आले आहे.

**Resultant Vacancies for year 2017-18 for a particular Branch (RV)**

RV= CV+IT+OT+LT-IA-EA-DA+LV explanation of various terms used in this formula is given below

CV= {SI Sanctioned Intake of 2016-17 for 1st Year - Candidates admitted in first year during Academic Year 2016-17 }

| Terms | Particulars |
|---|---|
| CV | Carried forward vacancies of the First Year for admission to Direct Second Year in 2017-18 |
| IT | Candidates transferred from the program/branch internally to other programmes/branches |
| OT | Candidate transferred from the program/branch to Other institutes |
| LT | Candidates permanently Left (discontinued) institute by taking T.C./L.C. |
| IA | Candidates admitted to the program internally due to transfer from Other programmes/branches |
| EA | Candidates admitted to the program (externally) due to transfer from Other institutes |
| DA | Ex. students / Drop out students of earlier years became eligible and admitted to course in second year during 2017-18 |
| LV | 20% or 10% (As the case may be) of SI of 2016-17 |

त्याअनुषंगाने सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या संस्थांना उपरोक्त बाब निर्दशनास आणण्यात यावी आणि प्रथम फेरीचे अलॉटमेंट झालेले असल्यामुळे फक्त **LT=Candidates permanently Left in First Year 2016-**

17 (discontinued) institute by taking T.C./L.C. नुसार अधिक होणाऱ्या जागा संबंधित संस्थेतील प्राचार्यांनी दि. २०.०७.२०१७ पर्यंत Institute Login मधुन माहिती अद्यावत करुन सहसंचालक यांनी दि. २१.०७.२०१७ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कन्फेम करण्यात याव्यात. जेणेकरुन दि. २३.०७.२०१७ रोजी प्रसिध्द होणाऱ्या **Provisional Display of Category wise Seats (Seat Matrix) for CAP Round II** उपलब्ध जागा दर्शविण्यात येतील.

तरी वर नमुद LT नुसारची कार्यवाही विहित कालावधीत पुर्ण करुन घेण्यात यावी.

(**चंद्रशेखर ओक**) भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रतिलिपी:- मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, बांद्रा (पुर्व), मुंबई यांना माहितीस्तव सादर.
**प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.**
१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.
२. प्रणाली विश्लेषक, कार्यासन क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनूदानित व विनाअनुदानित संस्था
४. प्राचार्य, सर्व सुविधा केंद्र व ए.आर.सी.
५. निवडनस्ती.